अतितात्काळ

क्र.पोमसं/१/बदली/११-०८/२०२३
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दिनांक:- २५/०४/२०२३

**संदर्भ:** शासन आदेश गृह विभाग क्र. आयपीएस -२०२३/प्र.क्र.१६८/एक/पोल-१, दि.२५/०४/२०२३

**विषय:-** अपर पोलीस महासंचालक श्रेणीतील पदावर पदोन्नतीने/बदलीने पदस्थापना.

*******

संदर्भांकित आदेशान्वये, अपर पोलीस महासंचालक पदाचे अधिकाऱ्यांची पदोन्नती व बदलीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

२. तरी, नियंत्रक अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त अधिका-यांच्या बाबतीत, तसेच त्यांच्या नवीन नियुक्तीच्या बाबतीत, मा. केंद्रिय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश तसेच निवडणूकीची आदर्श आचारसंहिता विचारात घेऊन तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. संबंधीत नियंत्रक अधिकारी यांना विनंती करण्यात येते की,

(अ) संबंधित अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यानंतर संबंधित अधिकारी यांनी पदोन्तीच्या पदावर पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ रूजू व्हावे.

(ब) उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या पदभार हस्तांतरण प्रमाणपत्रांच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

२५/४/२०२३
(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व संबंधितांना

प्रत:-

अपर पोलीस महासंचालक,(का व सु)महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके , महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे , महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन , महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, महामार्ग सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. म. राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

**प्रत सादर:-**

अपर मुख्य सचिव. महाराष्ट्र शासन.गृहविभाग.मंत्रालय.दुसरा मजला.हुतात्मा राजगुरु चौक.मुंबई३२.

(लक्षवेध:-श्री. व्यंकटेश भट, सह सचिव)

**प्रत:-**

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ - २ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पुणे
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
संबधित जिल्हा कोषागार अधिकारी
पोलीस महासंचालक यांचे सहायक
पोलीस अधीक्षक,राज्य पोलीस नियंत्रण कक्ष,मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष,पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई.

२/- सदरचे आदेश"Promotion & Transfer order for ADGP" या शीर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेतस्थळावर तीन महिन्यांकरीता कृपया प्रसिध्द करण्यात यावेत.

“अपर पोलीस महासंचालक”
श्रेणीतील पदावर पदोन्नतीने/
बदलीने पदस्थापना करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन आदेश क्र. आयपीएस-२०२३/प्र.क्र.१६८/एक/पोल-१

दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.

दिनांक : २५ एप्रिल २०२३.

**शासन आदेश.**

*“अपर पोलीस महासंचालक”* श्रेणीतील पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या *“विशेष पोलीस महानिरीक्षक”* श्रेणीतील भा.पो.से. अधिका-यांच्या *“निवडसूची २०२३”* यामध्ये समाविष्ट, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद भा.पो.से. अधिका-यांची, स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट *“अपर पोलीस महासंचालक”* श्रेणीतील पदांवर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. (१) | भा.पो.से. अधिका-याचे नाव (२) | विद्यमान पदस्थापना (३) | पदोन्नतीने पदस्थापना (४) |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश कुमार मेकला | विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | अपर पोलीस महासंचालक व नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री. राजकुमार व्हटकर | विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ३. | श्री. राजेश कुमार | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक *(पद उन्नत करुन).* |
| ४. | श्री. कृष्ण प्रकाश | विशेष पोलीस महानिरीक्षक, व्ही.आय.पी. सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

२. तसेच, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद *“अपर पोलीस महासंचालक”* श्रेणीतील भा.पो.से. अधिका-यांची, स्तंभ (३) मध्ये नमूद पदांवरुन, स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट पदांवर, याद्वारे, बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे-

| अ.क्र.<br><br>(१) | भा.पो.से. अधिका-याचे नाव<br><br>(२) | विद्यमान पदस्थापना<br><br>(३) | बदलीने पदस्थापना<br><br>(४) |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय सक्सेना | प्रधान सचिव (विशेष),<br>गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | अपर पोलीस महासंचालक,<br>कायदा व सुव्यवस्था,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री. अनुप कुमार सिंह | अपर पोलीस महासंचालक,<br>प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | प्रधान सचिव (विशेष),<br>गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ३. | श्री. निखिल गुप्ता | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत | अपर पोलीस महासंचालक,<br>प्रशासन, महाराष्ट्र राज्य,<br>मुंबई. |
| ४. | श्री. रविंद्र सिंगल | अपर पोलीस महासंचालक व<br>नियंत्रक, वैधमापन शास्त्र,<br>महराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक,<br>महामार्ग सुरक्षा,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ५. | श्री. सुखविंदर सिंह | अपर पोलीस महासंचालक,<br>फोर्स वन, महाराष्ट्र राज्य,<br>मुंबई. | अपर पोलीस महासंचालक,<br>आर्थिक गुन्हे,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

३. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा.केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, निवडणुकीची आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

४. हा शासन आदेश, पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक १ यांच्या शिफारशींचा यथायोग्य विचार करुन आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम याच्या कलम २२न मध्ये निर्दिष्ट सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०४२५२०१११४७८२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( व्यंकटेश भट )**
शासनाचे सह सचिव.

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, का. व सु., महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) अपर पोलीस महासंचालक, प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११) अपर पोलीस महासंचालक, महामार्ग सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ नाशिक.
१६) संबंधित भा.पो.से. अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
१७) सहायक संचालक, भा.पो.से. कक्ष, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती, पोल-१.